# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:22.05.2025** **वार:गुरुवार**

---

1. ऐन उन्हाळ्यात मोसमीसदृश्य पावसामुळं 23 जिल्ह्यांमधील 23 हजार हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावरील पिकांचं नुकसान
2. खरीप हंगामात शेतकऱ्यांना बियाणं आणि खतांचा तुटवडा भासणार नाही-मुख्यमंत्र्यांची स्पष्टोक्ती
3. राज्यातील पंधरा अमृत भारत रेल्वे स्थानकांचं आज पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन आणि
4. जागतिक ख्यातीचे खगोलशास्त्रज्ञ डॉक्टर जयंत नारळीकर अनंतात विलीन

**<u>पिक नुकसान</u>**

गेल्या पंधरा दिवसांपासून राज्यात सुरू असलेल्या पावसामुळे 23 जिल्ह्यांमधील 23 हजार हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावरील पिकांचं नुकसान झालं आहे. एक वृत्तांत...

**कृषी विभागानं दिलेल्या आकडेवारीनुसार सहा ते 20 मेपर्यंत राज्यातील 23 जिल्ह्यांमध्ये 23 हजार 331 हेक्टरवरील पिकांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पिकांमध्ये केळी, आंबा, डाळिंब, पपई, चिकू तसेच कांदा, भाजीपाला, बाजरी, मका, लिंबू, संत्रा, उन्हाळी भात या पिकांचा समावेश आहे.**

**सर्वाधिक नुकसान अमरावती जिल्ह्यातील अचलपूर, भातकुली, चांदूरबाजार, चिखलदरा या चार तालुक्यांमध्ये झालं आहे. नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करण्यासाठी महसूल आणि कृषी विभागातील कर्मचारी बांधावर पोहोचले असून, याचा सविस्तर अहवाल लवकरच राज्य सरकारला सादर करण्यात येईल, अशी माहिती पुणे कृषी विभागानं दिली.**

**रत्नागिरी जिल्ह्याला पावसानं अक्षरशः झोडपून काढलं. जोराचे वारे आणि वीजांसह मुसळधार पावसामुळं जनजीवन विस्कळीत झालं. रत्नागिरी, लांजा, राजापूर, संगमेश्वर, दापोली, खेड, चिपळूण, गुहागर अशा जवळपास सर्वच तालुक्यांमध्ये मोठा पाऊस झाला. महामार्गासह ठिकठिकाणी पाणी साचलं. झाडं पडल्यामुळे काही ठिकाणी वाहतूक खोळंबली. वीजपुरवठा खंडित झाला. दापोली तालुक्यातल्या हर्णे बंदरातल्या मासेमारांची त्रेधा उडाली. सुरक्षिततेसाठी साडेतीनशेहून अधिक नौका आंजर्ले खाडीत नेण्यात आल्या. लांजा तालुक्यातल्या वेरवली खुर्द इथल्या बोगद्याजवळ दरड कोसळल्यामुळं कोकण रेल्वेची वाहतूक सुमारे अडीच तास खोळंबली होती. हंगामाच्या अखेरच्या टप्प्यात आलेल्या या पावसामुळं आंबा व्यावसायिकांचं, तसंच मासेमारांचं मोठं नुकसान झालं आहे. पाणीटंचाईच्या समस्येची आणि तापमानाची तीव्रता मात्र काहीशी कमी व्हायला मदत झाली आहे. मोसमी पावसासारखंच वातावरण आहे.**

**सिंधुदुर्गला मॉन्सूनपूर्व वादळी पावसानं सिंधुदुर्गला झोडपून काढल्यानं जनजीवन विस्कळीत झालं. मंगळवारी 24 तासात सरासरी 96 मिलीमीटर पावसाची नोंद झाली. सर्वाधिक पाऊस वेंगुर्ले तालुक्यात 162 मिलिमीटर पडला. अनेक ठिकाणी झाडं वीज वाहिन्यांनवर कोसळल्यामुळं वीजपुरवठा खंडित झाला. मासेमारांना पुढचे दोन दिवस समुद्रात मासेमारीसाठी न जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे.**

**लातूर जिल्ह्यात सलग चार दिवस मुसळधार पावसामुळं ऐन उन्हाळ्यात रेना नदी प्रवाहित झाली. निलंगा तालुक्यातील कासारशिरसी परिसरात अनेक ठिकाणी कांदा भिजून कुजल्यानं तो फेकून देण्याची वेळ आली आहे. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी ठिकठिकाणच्या बातमीदारांसह, पूजा दीक्षित पुणे.**

**पाऊस-रायगड**

रायगड जिल्ह्यात गेल्या दोन दिवसापांसून जोराचा पाऊस सुरु आहे. अरबी समुद्र खवळण्याची शक्यता असल्यानं जिल्हा प्रशासनानं मासेमारांना सावध राहण्याचा इशारा दिला आहे.

**पाऊस-धाराशिव**

धाराशिव जिल्ह्यात एप्रिल आणि मे महिन्यात झालेल्या पावसामुळं शेती, फळबागा, घरं, जनावरं आणि इतर मालमत्तेचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे.

**पाऊस-सोलापुर**

सोलापुर जिल्ह्यात यंदाचा पावसाळा लवकरच सुरु झाल्याची चाहुल लागली आहे. अनेक तालुक्यात जोरदार पाऊस झाल्यानं ओढे, नाले, नद्या प्रवाहित झाल्या आहेत. फळबागांचं मात्र मोठं नुकसान होत असल्यानं शेतकऱ्यांच्या मनात संमिश्र भावना आहेत.

**आढावा**

आपत्तीच्या काळात सर्व अधिकाऱ्यांनी जबाबदारी म्हणून 24 तास दक्ष राहावं; जीवित आणि वित्तहानी रोखण्यासाठी सतर्कतेनं काम करावं अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत मान्सूनपूर्व तयारी आढावा बैठकीत दिल्या.

**खरीप बैठक**

राज्यामध्ये आवश्यक बियाणं आणि खतांचा साठा उपलब्ध असून त्यांचा तुटवडा शेतकऱ्यांना भासणार नाही. मागील वर्षांचा कल पाहता कुठलं पीक कुठे कमी-अधिक प्रमाणात घेता येईल, याचा विचार करूनच त्या ठिकाणी बियाणांची उपलब्धता करून देण्यात आली आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत कृषी विभागाच्या राज्यस्तरीय खरीप हंगाम नियोजन आढावा बैठकीत सांगितलं. बोगस बियाण्यांवर आळा घालण्यासाठी राज्यानं केंद्र शासनाच्या 'साथी' या पोर्टलवर बियाणं नोंदणी करण्याचा नियम केला आहे. खतांच्या लिंकिंगची तक्रार आल्यास कडक कारवाई करण्यात येईल, प्रत्येक तालुक्यामध्ये डिजिटल शेतीशाळा आयोजित करण्यात येणार आहेत, कृषी विभागानं कृत्रिम बुद्धिमेतवर आधारित तयार केलेल्या 'महाविस्तार' ॲपवर शेतीच्या संदर्भातली सगळी माहिती आणि व्हिडिओज उपलब्ध आहेत. बँकांनी सिबिल स्कोअरची अट

ठेवणार नसल्याचं मान्य केलं आहे. एखाद्या बँक शाखेत सिबिल स्कोअरची मागणी करण्यात आली, तर त्या शाखेवर कारवाई करण्यात येईल. शेतकऱ्यांना वेळेत कर्जपुरवठा झाला पाहिजे, याकडं सरकारचं संपूर्ण लक्ष असल्याचंही मुख्यमंत्र्यांनी आवर्जून सांगितलं.

**पंतप्रधान-अमृत स्थानक**

महाराष्ट्रातील पंधरा स्थानकांसह देशभरातील 103 अमृत भारत रेल्वे स्थानकांचं उद्घाटन आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. आधुनिक पायाभूत सुविधा, सांस्कृतिक वारसा, प्रवासी-केंद्रित सोयींसह ही स्थानकं पुन्हा विकसित करण्यात आली आहेत.

**नक्षलवाद**

छत्तीसगढमध्ये नारायणपुर इथं काल झालेल्या चकमकीत 27 कट्टर नक्षलवादी ठार करण्यात आल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी सुरक्षा दलांचं अभिनंदन केलं आहे. ऑपरेशन ब्लॅक फॉरेस्टच्या अंतर्गत महाराष्ट्रासह तीन राज्यांमध्ये 54 नक्षलवाद्यांना अटक करण्यात आली तर 84 नक्षलवादी शरण आल्याची माहिती शहा यांनी दिली.

**राजीव गांधी**

माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या स्मृतीदिनानिमित्त काल राज्यात विविध कार्यक्रमांद्वारे त्यांना आदरांजली वाहण्यात आली. हा स्मृतीदिन दहशतवाद आणि हिंसाचार विरोधी दिवस म्हणूनही पाळण्यात येतो.

**नारळीकर**

जागतिक ख्यातीचे खगोलशास्त्रज्ञ डॉक्टर जयंत नारळीकर यांच्या पार्थिव देहावर पुण्यातील वैकुंठ स्मशानभूमीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी डॉक्टर नारळीकर यांचे कुटुंबीय, नातेवाईक तसंच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. तत्पूर्वी डॉक्टर जयंत नारळीकर यांचं पार्थिव शरीर आंतर विद्यापीठ खगोलशास्त्र आणि खगोल भौतिकशास्त्र केंद्र म्हणजे आयुका संस्थेत अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आलं होतं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार तसंच अनेक मान्यवरांनी अंत्यदर्शन घेऊन डॉक्टर नारळीकर यांना श्रद्धांजली अर्पण केली. याप्रसंगी पोलीस दलानं सलामी दिली.

**रोहिणी-धुळे**

राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स 2023-24 स्पर्धेत धुळे जिल्ह्याच्या शिरपूर तालुक्यातील रोहिणी ग्रामपंचायतील सुवर्ण पुरस्कार काल जाहीर झाला आहे. रोहिणी ग्रामपंचायतीला रोख 10 लाख रुपये मिळणार आहे. विशाखापट्टणम इथं 9 जूनला होणाऱ्या राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स परिषदेत या पुरस्काराचं वितरण होणार आहे.

**ऑपरेशन सिंदूर-रायगड**

ऑपरेशन सिंदूरबाबत रायगड जिल्ह्यात अलिबाग इथल्या विधीज्ञ पल्लवी भिसे यांनी आपल्या भावना या शब्दांत व्यक्त केल्या आहेत...

**पहलगामच्या हल्ल्यानंतर ह्या सरकारने कठोर भूमिका घेतलेली आहे, आणि आपल्या सैन्यांनी ही भूमिका अतिशय चांगल्या पद्धतीने पुढे नेली आहे. कुरेशी मॅडम आणि व्योमिका मॅडम यांनी केलेल्या कामगिरीबद्दल मला प्रचंड अभिमान आहे. ज्यावेळेला पहिल्यांदाही या दोन स्त्रियांना बघितलं त्यावेळेला मला अभिमानाने मान उंचावतय हे म्हणायला हरकत नाही कारण इतकी मी भारावून गेले होते, की आज आपल्या सैन्याचं प्रतिनिधित्व दोन बायका करताय म्हणजे नक्कीच आपला देश हा पुढे प्रगतीपथावर जातोय याची मला खात्री आहे.**

## देशभक्ती-नंदुरबार

नंदुरबार जिल्ह्यातील औरंगपुरा इथले भिका पाटील यांनी नातवाच्या लग्नात खास भेट म्हणून ध्वजदिन निधीला 31 हजार रूपयांची देणगी देऊन आपलं देशप्रेम प्रकट केलं आहे. याबद्दल जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी निवृत्त मेजर डॉक्टर निलेश पाटील यांनी भिका पाटील यांचा सत्कार केला.

## कैलास

यावर्षीच्या कैलास मानसरोवर यात्रेसाठी 750 यात्रेकरुंची ऑनलाईन संगणकीय सोडतीद्वारे काल निवड करण्यात आली. पहिली तुकडी 30 जूनला रवाना होईल, 25 ऑगस्टपर्यंत प्रत्येकी 50 यात्रेकरुंच्या 15 पंधरा तुकड्या ही यात्रा पूर्ण करतील. यापैकी पाच तुकड्या लिपुलेखमार्गे तर दहा तुकड्या नथुलामार्गे जातील.

## खेलो इंडिया बीच स्पर्धा

दीव दमण इथं आयोजित पहिल्या खेलो इंडिया बीच स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी काल सागरी जलतरणात दिक्षा यादवनं पदक मिळवलं. घोघला समुद्र किनाऱ्यावर पारंपरिक पेंचक सिलट प्रकारात रिया चव्हाण आणि प्राजक्ता जाधव यांनी सुवर्णपदक पटकावलं. बीच कबड्डीच्या पुरुष आणि महिला गटात महाराष्ट्र संघ अग्रेसर आहेत.

## क्रिकेट

आय पी एल क्रिकेटमध्ये काल मुंबई इंडियन्सनं दिल्ली कॅपिटल्सचा 59 धावांनी पराभव करुन प्लेऑफमधलं स्थान निश्चित केलं. मुंबईनं दिलेल्या 180 धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना दिल्लीला केवळ 121 धावा करता आल्या.

## हवामान

राज्यात पुढील तीन दिवस विशेषतः कोंकणात अनेक ठिकाणी तर मध्य महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी विजांसह मध्यम ते जोरदार पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. नैऋत्य मोसमी अग्रेसर असून येत्या चार ते पाच दिवसांत मॉन्सून केरळमध्ये दाखल होण्यास अनुकूल स्थिती निर्माण झाली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.